महाराष्ट्र जनशक्ती

ई-पेपर (पीडीएफ) आवृत्ती व्हॉट्सअप आणि सोशल मीडियावर शेअर करण्यास परवानगी आहे!

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे. बातम्या व जाहिराती ७५८८००५००२ या नंबरवर व्हाट्सअॅप करा.

महाराष्ट्रातील जनसामान्यांच्या न्याय्य व हक्कासाठी लढणारी शक्ती

# महाराष्ट्र जनशक्ती

मुख्य संपादक : प्राचार्य डॉ. हसन इनामदार




छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) | वर्ष : दुसरे | अंक : २१३ वा | दिनांक : १७/०६/२०२५ | वार : मंगळवार

# नरेंद्र मोदी हे भित्रे भागूबाई - प्रकाश आंबेडकर यांची टीका



**मुंबई** : भारत-पाकिस्तान दरम्यान झालेल्या शस्त्रसंधी वरून आता वंचित बहुजन आघाडीचे प्रमुख प्रकाश आंबेडकर यांनी केंद्र सरकारवर तीव्र शब्दांत हल्लाबोल केला आहे. युद्धबंदी का जाहीर करावी लागली याचे स्पष्टीकरण केंद्र सरकारने द्यावे अशी मागणी प्रकाश आंबेडकरांनी केली आहे. युद्धबंदी जाहीर केली नसती, तर १९७१ च्या युद्धाची पुनरावृत्ती झाली असती. पण आता आपण ती संधी गमावली, असेही ते म्हणाले. शिवाय त्यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना भित्रे भागूबाई आणि कणा नसलेले नेतृत्व म्हटले आहे.

सोमवारी मुंबईत पत्रकार परिषदेत बोलताना आंबेडकर म्हणाले की, पुलवामानंतर भारत-पाकिस्तान दरम्यान निर्माण झालेल्या तणावाच्या पार्श्वभूमीवर अवघ्या तीन दिवसांत भारतीय वायुदलाने पूर्ण नियंत्रण मिळवले होते. पाकिस्तानकडे ना पुरेसे शस्त्रास्त्र होते ना सात दिवसांहून अधिक लढण्याची क्षमता. भारत पूर्णपणे वरचढ होता. हीच ती वेळ होती, ज्या वेळी आपण १९७१ चा इतिहास पुन्हा लिहू शकलो असतो. पण, केंद्र सरकारने शस्त्रसंधी करून ही संधी गमावली. प्रकाश आंबेडकर पुढे म्हणाले, "गेल्या २५ वर्षांपासून भारतावर सातत्याने दहशतवादी हल्ले होत आहेत. या हल्ल्यांमागे थेट पाकिस्तानच्या लष्कराचा हात आहे. पहलगाम हल्ल्यानंतर भारताकडे पाकिस्तानचा कायमचा बंदोबस्त करण्याची सुवर्णसंधी होती. फक्त दहशतवाद संपवायचा नव्हता, तर पाकिस्तानचा देखील खात्मा करायचा होता. पण सरकारने ती दिशा न स्वीकारता माघार घेतली. यावर पंतप्रधान मोदी आणि संपूर्ण सरकारने खुलासा करावा, अशी मागणीही त्यांनी केली. देशावर दहशतवादी हल्ले झाले की अमेरिका आपल्याला वाचवायला येत नाही. आपले वीर जवानच आपली रक्षा करतात. म्हणूनच मी पुन्हा पुन्हा सांगतो, आपण मोठी ऐतिहासिक संधी गमावली, असेही आंबेडकर म्हणाले.

भारत आणि पाकिस्तान युद्धाचे नियंत्रण हे डोनाल्ड ट्रम्प यांच्याकडे असल्याचं प्रकाश आंबेडकर म्हणाले, ते म्हणाले की, "पहलगाम बाबत जी लढाई झाली त्याचे नियंत्रण हे ट्रम्प यांच्याकडे होते. भारत-पाकिस्तानने किती दिवस लढायचे, कधी थांबायचे हे ट्रम्प यांनी ठरवले. ट्रम्प यांनी केलेला दावा खोडून काढण्याची धमकी नरेंद्र मोदी यांच्याकडे नाही."

अमेरिकेच्या दबावानंतर नरेंद्र मोदींनी युद्धबंदी जाहीर केली, आपला पंतप्रधान हे भित्रे भागूबाई आहेत हे सिद्ध झालं अशी टीका प्रकाश आंबेडकर यांनी केली. इराणसारखा देश डोनाल्ड ट्रम्प यांना भीक घालत नाही, पण मोदींनी तशी भूमिका घेतली नाही. नरेंद्र मोदी हे कणा नसलेले नेतृत्व असल्याची टीकाही त्यांनी केली.

# विधानसभेप्रमाणे महानगरपालिकेतही परिवर्तन करायचे - देवेंद्र फडणवीस



**वसई** : आमदार स्नेहा दुबे पंडित यांच्या भाजप जनसंपर्क कार्यालयाचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते आज उद्घाटन पार पडले. यावेळी त्यांनी कार्यकर्त्यांना मार्गदर्शन करत महानगरपालिकेच्या निवडणुकीसाठी तयारी करण्याचे आवाहन केले. मागील २० वर्षांचा बॅकलॉग भरून काढण्यासाठी विधानसभेत परिवर्तन केले, तसे महापालिकेत करावे लागेल, असे आवाहन देवेंद्र फडणवीस यांनी कार्यकर्त्यांना केले आहे.

पालघर जिल्ह्यात निवडणुका जिंकल्यानंतर प्रथमच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस वसईत दाखल झाले. प्रधानमंत्री धरती आबा जनजातीय ग्राम उत्कर्ष अभियान अंतर्गत धरती आबा लोकसहभाग मोहिमेचा जिल्ह्यात शुभारंभ, शालेय विद्यार्थ्यांचे स्वागत, वाढवण बंदर चर्चा सभा, बांबू लागवड उपक्रम, वसई विरार महापालिकेच्या सर डीएम पेटिट विस्तारित रुग्णालय, बोळींज पोलिस ठाण्याचे एसीपी, डीसीपी कार्यालयाचे ऑनलाइन प्रणाली द्वारे उद्घाटन अशा विविध प्रकारच्या कार्यक्रमासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे पालघर जिल्ह्याच्या दौऱ्यावर आले होते. या दौऱ्यात स्नेहा दुबे पंडित यांच्याही जनसंपर्क कार्यालयाचे उद्घाटन देवेंद्र फडणवीस केले. यावेळी कार्यकर्त्यांशी संवाद साधताना त्यांनी उपरोक्त आवाहन केले आहे.

स्नेहा दुबे पंडित यांच्या नेतृत्वात वसई पालघर भागात आपल्याला परिवर्तन घडवायचे आहे. मी असेल, पालकमंत्री गणेश नाईक आम्ही सगळे पूर्ण ताकदीने स्नेहा दुबे पंडित यांच्या पाठीशी उभे आहोत, असे देवेंद्र फडणवीस म्हणाले. पाच वर्षांमध्ये तुमचा गेल्या वीस वर्षांचा बॅकलॉग भरून काढण्याचा निर्णय आम्ही घेतला असल्याचे त्यांनी आश्वस्त केले. यानंतर कार्यकर्त्यांनी देवा भाऊ जिंदाबादच्या घोषणा दिल्या. त्यावर जिंदाबाद म्हणून चालणार नाही. बॅकलॉग भरायचा असेल, तर जसे परिवर्तन विधानसभेत केले, तसे महानगरपालिकेतही करावे लागेल, असे आवाहन फडणवीस यांनी कार्यकर्त्यांना केले.

फडणवीस पुढे म्हणाले, तुमच्या परिवर्तनाची गुरूकिल्ली महानगरपालिकेत आहे. ती जो पर्यंत आपल्याकडे येत नाही, तोपर्यंत आपण कितीही स्वप्न बघितली, तर ती दरवाजाजवळ येऊन थांबणार आहेत, ती पुढे जाऊ शकणार नाही. त्यामुळे आता सर्वांनी जोरात कामाला लागा. महानगरपालिकेच्या दृष्टीने पूर्ण ताकदीने उतरा. तिथे देखील परिवर्तन घडवा. तुम्ही महानगरपालिकेत परिवर्तन घडवल्यानंतर पुढील पाच वर्षात काय परिवर्तन होते ते बघा, असेही देवेंद्र फडणवीस म्हणाले.

दरम्यान, आगामी काळात होणाऱ्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीसाठी उद्धव ठाकरे यांच्या नेतृत्वाखालील शिवसेना देखील तयारीला लागली आहे. मुंबई महापालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर रविवारी मुंबईतील सेना भवन येथे शाखा प्रमुखांची बैठक पार पडली. येत्या काळात होत असलेल्या निवडणुकीत शिवसेना सोडून गेलेल्या मंडळींना आता त्यांची जागा दाखवून देण्याची वेळ आली आहे. सर्व कार्यकर्त्यांनी अंग झटकून कामाला लागा. त्यासाठी दररोज ३०० घरातील मतदारांची भेट घेण्याचे लक्ष्य ठेवावे. त्यानुसार दिवसभराच्या कामाचे नियोजन करावे. त्यासोबतच पक्षाने केलेले काम या मतदारांची भेट घेऊन त्यांच्यापर्यंत पोचवावा, अशा सूचना उद्धव ठाकरेंनी शाखा प्रमुखांना दिल्या.

# लाडकी बहीण योजनेवर येणार चित्रपट : गौतमी पाटील आणि अण्णा नाईकांची दिसणार केमिस्ट्री

**मुंबई** : महाराष्ट्र शासनाची महत्त्वाकांक्षी मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण या योजनेवर आता मराठी चित्रपट येणार आहे. या चित्रपटात प्रसिद्ध नृत्यांगना गौतमी पाटील आणि रात्रीस खेळ चाले फेम अण्णा नाईक म्हणजेच अभिनेते माधव अभ्यंकर यांची केमिस्ट्री प्रेक्षकांना पाहायला मिळणार आहे. नुकताच या चित्रपटाचा साताऱ्यात मुहूर्त पार पडला. सांस्कृतिक मंत्री आशिष शेलार यांच्या हस्ते सिनेमाच्या मुहूर्ताचा क्लॅप देण्यात आला.

महायुती सरकारने विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर महिलांसाठी मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना सुरू केली. आतापर्यंत या योजनेचा लाभ असंख्य महिलांनी घेतला आहे. गरीब व कष्टकरी कुटुंबातील महिलांना आर्थिक स्थैर्य देण्याच्या दिशेने ही योजना मोलाची ठरली आहे. सर्वाधिक चर्चेत असलेली ही योजना आता मोठ्या पडद्यावर अवतरणार आहे. 'लाडकी बहीण' हा चित्रपट वास्तव आणि मनोरंजन यांची सांगड घालत प्रेक्षकांसमोर मांडला जाणार आहे.

या चित्रपटाची कथा राज्य शासनाने सुरू केलेल्या 'लाडकी बहीण योजना' या उपक्रमावर आधारलेली असणार आहे. या योजनेंतर्गत राज्यातील अनेक महिलांना आर्थिक बळकटी देण्यात आली असून, त्यांची स्वावलंबनाकडे वाटचाल सुरू झाली आहे. याच प्रेरणादायी योजनेवर हा चित्रपट भाष्य करणार आहे. समाजोपयोगी विषयावर आधारलेला हा चित्रपट केवळ माहितीपर नसून, तो संपूर्ण कुटुंबासाठी मनोरंजनाने परिपूर्ण असा अनुभव देईल, असे निर्मात्यांनी सांगितले. तर, एक गंभीर आणि समाजासाठी महत्त्वाचा विषय हलक्याफुलक्या शैलीत मांडत एक प्रेरणादायी कथा मोठ्या पडद्यावर उभी करण्याचा प्रयत्न यातून होणार असल्याचे मत दिग्दर्शकांनी व्यक्त केले.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), मंगळवार १७ जून २०२५


## विद्यार्थ्यांच्या सोयीसाठी 'एस.टी. महामंडळा'चा उपक्रम




**कन्नड (स्वप्नील राठोड) :** श्री संत ज्ञानेश्वर विद्या मंदिर, शिवनगर कन्नड येथे शैक्षणिक २५-२६ वर्षाच्या पहिल्याच दिवशी विद्यार्थ्यांच्या प्रवासाच्या सोयीसाठी महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या (एस.टी. महामंडळ) वतीने बस पास वितरण व जनजागृती उपक्रम राबवण्यात आला.या उपक्रमात विद्यार्थ्यांना बस पास मिळवण्याची प्रक्रिया, लागणाऱ्या कागदपत्रांची माहिती, प्रवासातील त्रास टाळण्याचे उपाय, आणि वेळेचा बचाव याविषयी सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले. विशेष म्हणजे, 'पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर बस प्रवास योजना' अंतर्गत मुलींना मोफत प्रवासाची सुविधा उपलब्ध असून, मुलांना जवळपास ६६% पर्यंत सवलतीचे बस पास मिळू शकतात, याबाबत उपस्थितांना माहिती देण्यात आली. कार्यक्रमावेळी काही विद्यार्थ्यांना प्रतिकात्मक स्वरूपात पास वितरित करून या योजनेचे प्रत्यक्ष महत्त्व समजावण्यात आले. या उपक्रमासाठी कन्नड बस स्थानक प्रमुख श्री. संघर्ष पगारे, सहायक वाहतूक निरीक्षक श्रीराम पवार, वाहतूक नियंत्रक गणेश खंडागळे, तसेच लिपिक अमोल भिंगारे यांनी विशेष प्रयत्न केले.शाळेचे मुख्याध्यापक, सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, तसेच विद्यार्थी व पालक यांची या वेळी उपस्थिती होती.हा उपक्रम विद्यार्थ्यांच्या दृष्टीने अत्यंत उपयुक्त असून, भविष्यातही असेच विद्यार्थीहिताचे उपक्रम राबवण्याचा संकल्प व्यक्त करण्यात आला.

## कन्नड तालुक्यातील प्रा. राजेंद्र नेवगे व प्रकाश मैंद फरीदाबाद विद्यापीठाच्या मानद डॉक्टररेट पदवीने सन्मानित




**कन्नड** तालुक्यातील श्री गणेश विद्यालय देवगावं रंगारी येथील प्रा .राजेंद्र नेवगे तसेच पिशोर येथील समता कन्या विद्यालयातील सह शिक्षक प्रकाश मैंद यांना फरीदाबाद येथील मॅजिक अँड आर्ट विद्यापीठाच्या सन्मानाच्या मानद डॉक्टररेट पदवीने दि. १४जून रोजी एका मोठ्या दिमाखदार सोहळ्यात सन्मानित केले. प्रा राजेंद्र नेवगे यांना त्यांच्या २५ वर्षातील शैक्षणिक आणि सामाजिक क्षेत्रात केलेल्या भरीव कामगिरीबद्दल व प्रकाश मैंद यांना गेल्या २५ वर्षातील पत्रकारितेच्या क्षेत्रात उल्लेखनीय कार्य केल्यामुळे मानद डॉक्टररेट पदवी करण्यात आली.यापैकी प्रा . राजेंद्र नेवगे यांना आतापर्यंत विविध राष्ट्रीय राज्यस्तरीय पुरस्काराने सन्मानित करण्यात आलेले आहेत. तर प्रकाश मैंद यांना नुकताच अहिल्यादेवी जयंतीनिमित्त मलकापूर जि. बुलढाणा येथे आयोजित राज्यस्तरीय सोहळ्यात इंडीयन एक्सलन्स या पुरस्काराने गौरविण्यात आले होते .मॅजिक बुक ऑफ रेकॉर्ड्सने आयोजित केलेल्या या पुरस्कार वितरण समारंभात डॉ. राम अवतार शर्मा भारताचे सर्वोच्च न्यायालयाचे जेष्ठ विधितज्ञ, दिल्लीचे पोलीस उपनिरीक्षक किरण सेठी,दिल्लीचे स्वसंरक्षण प्रशिक्षक शिवकुमार कोहली, चित्रपट अभिनेते आणि दिग्दर्शक श्री. गंगला डॉ. विजय कुमार आणि सामाजिक कार्यकर्त्या हेमलता यादव डायरेक्टर सी. पी. यादव या प्रमुख अतिथीच्या हस्ते पदवी प्रदान करण्यात आल्या.याप्रसंगी भारतातील १८राज्यातील विविध ठिकाणाहून ६४ व्यक्तींनां आपल्या क्षेत्रातील कार्यातील योगदाना मुळे सन्मानित करण्यात आले.या मानद डॉक्टररेट पदवीमुळे या दोघांचे श्री गणेश शिक्षण संस्थेचे अध्यक्ष डॉ प्रकाश भांडवलदार, सचिव एल डी भांडवलदार, जन्मभूमी मित्रमंडळ अंधानेर तसेच सावित्रीबाई फुले शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष के. एस. कोल्हे, सचिव पी. एम. डहाके, कोषाध्यक्ष यू .एल. नवले, सहसचिव व्हि. ए. नवले, सर्व पदाधीकारी समता समूहाचे सहकारी, घाटमाथा पत्रकार संघ, ग्रामीण बहुउद्देशीय पत्रकार संघ पिशोर व ग्रामस्थांच्या वतीने अभिनंदन करण्यात आले .

## नवीन उमेद, स्वप्न साकारण्यासाठी प्रवेशोत्सव



**मुरुम (प्रा. डॉ. सुधीर पंचगल्ले) :** जि. प. स्पेशल प्रा शाळा मुरूम येथे प्रवेश उत्सव मोठ्या थाटामाटात साजरा करण्यात आला.शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष निर्मलकुमार लिमये यांच्या ट्रॅक्टर मधून भीमनगर, साठेनगर, महादेव नगर, पोस्ट कार्यालय, नगरपरिषद, नेहरू नगर मार्गे मिरवणूक काढण्यात आली. अध्यक्षांनी स्वतः ट्रॅक्टरची सजावट करुन त्यांचे सारथ्य केले. उपाध्यक्ष शिवराज कांबळे यांच्याकडुन गोड शिरा वाटप करण्यात आले. यावेळी नवागत विद्यार्थ्यांचे पहिले पाऊल शाळेत उपक्रम घेण्यात आला. त्यांना पुस्तके, फुगे, चॉकलेट, पुष्पगुच्छ देऊन त्यांचे स्वागत करण्यात आले. यावेळी शाळेच्या वतीने सदस्य सतीश भालेराव, अरविंद कांबळे, मनिषा भालेराव, जयपाल सुरवसे, लखन देडे, मोतीराम गायकवाड, आकाश कांबळे, अभिषेक कांबळे आदीमान्यवरांचे स्वागत शाळेचे मुख्याध्यापिका प्रमिला तुपेरे सहशिक्षक रुपचंद ख्याडे, शिवाजी गायकवाड, सुनिता मिरगाळे, मंगल कचले अमर कांबळे यांनी केले. जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. मैनाक घोष यांच्या संदेशाचे वाचन रुपचंद ख्याडे यांनी केले. संदेश वाचन करून मान्यवरांचे विविध शुभेच्छा संदेशाचे वाचन केले. राजेश गायकवाड यांनी प्रवेश उत्सवाचे सुंदर फलक लेखन केले.तसेच शाळेतील परिसराची स्वच्छता सर्व विद्यार्थी व शिक्षकांनी केल्याबद्दल उपस्थित मान्यवरांनी समाधान व्यक्त केले. याप्रसंगी धम्मचारी, निर्मलकुमार लिमये यांनी मनोगत व्यक्त करून विद्यार्थ्यांना नवीन शैक्षणिक वर्षाच्या शुभेच्छा दिले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी शाळेतील सर्वांचे योगदान लाभले.


ADMISSION OPEN

10th, 12th and Graduate Students
Government Recognised
Job Guarantee Courses

DMLT | P.G.DMLT
X-RAY | C.T.-SCAN
E.C.G. | Radiology
Physiotherapy | Optometry
O. T. TECHNICIAN
PG Radiology

Contact : 9405109103
8830838903

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), मंगळवार १७ जून २०२५


## बसव प्रतिष्ठाच्या वतीने केंद्रीय प्राथमिक शाळेत गरजू विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वाटप



**मुरूम (प्रा. डॉ. सुधीर पंचगल्ले) :** बसव प्रतिष्ठाण अखिल भारतीय सामाजिक संघटनेच्या वतीने दि. १६ वार सोमवार रोजी शाळा प्रवेशोत्सवाचे औचित्य साधुन शाळेच्या पहिल्या दिवशीच १ली ते ४थी च्या ५० गरजू विद्यार्थ्यांना शाळे साठी लागणाऱ्या सर्व शालेय साहित्याचे वाटप करण्यात आले. याप्रसंगी माजी उपनगराध्यक्ष श्रीकांत बेंडकाळे, माजी नगर सेवक सुरेश शेळके,अनंत लोखंडे, पालक हुसेन तांबोळी, दिगंबर सोनटक्के, बसव प्रतिष्ठाण अध्यक्ष डॉ. रामलिंग पुराणे आदींची प्रमुख उपस्थिती होती, उपस्थित मान्यवरांच्या हस्ते विद्यार्थ्यांना शालेय साहित्य वाटप करण्यात आला. अनेक गरजू विद्यार्थ्यांना शालेय साहित्य पासून वंचित असतात आणि त्यामुळे ते शिक्षणापासून दूर जायला लागतात अशा विद्यार्थ्यांना पाठबळ मिळावे या उद्धात हेतूने बसव प्रतिष्ठाण च्या माध्यमातून सातत्याने शालेय उपयोगी कार्यक्रम राबविले जातात आणि त्याचाच एक भाग म्हणून आज विद्यार्थ्यांना शालेय साहित्य वाटप करण्यात आले असल्याचे मत अध्यक्ष डॉ. रामलिंग पुराणे यांनी मांडले. याप्रसंगी शालेय पालक समिती जैरुबीना मुल्ला,सोनाली जाधव, पालक प्रतिनिधी आदींची उपस्थिती होती.बोईनवाड अशोक,माने शैलजा,हुल्ले सुनंदा,हिरेमठ मेघादेवी आदिनी परिश्रम घेतले.

## रविंद्रनाथ टागोर प्राथमिक शाळेत प्रवेशोत्सव जल्लोषात साजरा झाला



**कन्नड (स्वप्नील राठोड) :** रविंद्रनाथ टागोर प्राथमिक शाळेत नवीन शैक्षणिक वर्षाच्या स्वागतासाठी भरगच्च उत्सवाचे आयोजन करण्यात आले. नवागत विद्यार्थ्यांचे आणि त्यांच्या पालकांचे ढोलताशांच्या गजरात जल्लोषात स्वागत करण्यात आले. शाळेच्या आवारात फुलांची उधळण करत, गुलाबपुष्प, पाठ्यपुस्तके आणि मिष्टान्न वाटप करत उपस्थितांचे औक्षण करण्यात आले.या वेळी शाळेचे मुख्याध्यापक श्री. रविंद्र निळ, पालक प्रतिनिधी श्री. जाधव, श्री. पांडव, अस्लम पठाण, सौ. झेंडे, श्री. व सौ. चुंगडे, तसेच शिक्षकवृंद आणि पालक मंडळी उपस्थित होते. कार्यक्रमात इयत्ता पहिली ते चौथीतील विद्यार्थ्यांना गुलाबपुष्प व नवीन पाठ्यपुस्तके वाटण्यात आली.मुख्याध्यापक श्री. निळ यांनी शाळेची माहिती देत नवख्या विद्यार्थ्यांना शुभेच्छा दिल्या आणि पालकांचे आभार मानले.कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी श्री. संजय पवार, श्री. अमेय अहिरे, श्री. सोपान गवळी, श्री. कृष्णा गायके, श्रीमती वैशाली घुले, श्री. नवनाथ करवंदे, श्रीमती मोरे, तसेच संपूर्ण शिक्षकवर्ग यांनी विशेष परिश्रम घेतले.या अनोख्या स्वागतामुळे शाळेचे वातावरण प्रेरणादायी बनले असून, विद्यार्थी व पालकांमध्ये नवचैतन्याची भावना निर्माण झाली आहे, अशी प्रतिक्रिया ग्रामस्थ आणि शिक्षकांनी व्यक्त केली.






## प्रा. डॉ. प्रवीण घोडेस्वार यांना सूर्योदय अक्षरदीप पुरस्कार जाहीर



**नाशिक :** येथील यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठातल्या विद्यार्थी सेवा विभागातील प्रोफेसर, सामाजिक प्रश्नांचे अभ्यासक आणि स्तंभलेखक प्रा. डॉ. प्रवीण घोडेस्वार यांना जळगांव येथील सूर्योदय सर्वसमावेशक मंडळाचा ' सूर्योदय अक्षरदीप' पुरस्कार नुकताच जाहीर झाला आहे. मंडळाच्या तेविसाव्या वर्धापन दिनाच्या निमित्ताने अध्यक्ष सतीश जैन यांनी पुरस्काराची घोषणा केली असून लवकरच आयोजित होणाऱ्या तिसऱ्या अखिल भारतीय सूर्योदय मराठी साहित्य संमेलनात हा पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहे.प्रा. डॉ . घोडेस्वार यांना या आधी विकासात्मक लेखनासाठी पा. वा. गाडगीळ पुरस्कार आणि लिंगभाव संवेदनशील लेखनासाठी ' राष्ट्रीय स्तरावरील 'लाडली मिडिया जेंडर सेन्सिटिव्हीटी' पुरस्कार दोनदा प्राप्त झाले आहेत. त्यांची आतापर्यंत विविध विषयांवरची बारा पुस्तके प्रकाशित झाली असून सार्वजनिक वाचनालय नाशिकचा आदर्श शिक्षक पुरस्कारही त्यांना प्राप्त झाला आहे. पुरस्कार जाहीर झाल्याबद्दल हितचिंतक-मित्रमंडळी यांनी त्यांचे अभिनंदन केले आहे.


बातम्या व जाहिरातीसाठी संपर्क 7588005002

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे.
कृपया दुपारी 12 ते रात्री 8 या वेळेत संपर्क करा.
संपर्क क्र. 7588005002

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), मंगळवार १७ जून २०२५


## अंनिस कार्यकर्त्यांनी सजग राहण्याची गरज: डॉ. रश्मी बोरीकर



**छत्रपती संभाजीनगर :** अंधश्रद्धेच्या विरोधात अंनिस कार्यकर्त्यांनी सजग राहण्याची गरज असल्याचे प्रतिपादन अंनिसच्या राज्य उपाध्यक्षा डॉ.रश्मी बोरीकर यांनी केले. शहिद डॉ.नरेंद्र दाभोलकर स्थापित महाराष्ट्र अंनिसची जिल्हा बैठक जिल्हाध्यक्ष श्रीराम जाधव यांचा अध्यक्षतेखाली रविवारी घेण्यात आली, यावळी त्या बोलत होत्या. त्या पुढे म्हणाल्या की, सध्याची सामाजिक स्थिती परिवर्तनवाद्यांसाठी अत्यंत प्रतिकूल असली तरही विज्ञानवादी विचार सामान्यांपर्यंत पोचला पाहिजे. शहादा येथे दि.३०,३१मे आणि १जून असे तीन दिवस विस्तारित राज्य कार्यकारिणीत झालली चर्चा आणि ठरावाची विस्तृत माहिती राज्य सरचिटणीस शहाजी भोसले यांनी दिली. यावेळी डॉ. बोरीकर आणि शहाजी भोसले यांची राज्य कार्यकारिणीत निवड झाल्याबद्दल त्यांचा हृ दय सत्कार करण्यात आला. विविध शाखांच्या पदाधिकाऱ्यांनी अहवाल सादर केले. दादासाहेब शिंदे भास्कर बनसोडे यांनी प्रेरणा गीत गायले. अंनिस कार्यकर्ते दिवंगत व्ही. सी.भुयागळे यांच्यासह शहिदांना व विमान दुर्घटनेत मृत पावलेल्या प्रवाशांना आदरांजली अर्पण करण्यात आली. प्रारंभी जिल्हा प्रधान सचिव प्रा. शिवाजी वाठोरे यांनी प्रास्ताविक केले. सूत्रसंचालन जिल्हा कार्याध्यक्ष डी.एन.जाधव यांनी केले तर आभार शहर शाखा कार्याध्यक्ष सीमा शिंदे यांनी मानले. बैठकीस डॉ.अजित खोजरे, प्रशांत कांबळे, मोहन भोमे, डॉ. लुम्बिनी देबाजे,विजय मालुसरे, नितीन बारगळ, आनंद कसबेकर आदींसह सिल्लोड, लासूर स्टेशन, जळगाव घाट, आदी शाखांतील कार्यकर्त्यांसह शहरातील कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते, हे विशेष!

## प्राथमिक व माध्यमिक विद्यालय चिकलठाणा शाळाप्रवेश उत्सव मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला






**छत्रपती संभाजीनगर :** क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले छत्रपती संभाजी नगर महानगरपालिका प्राथमिक व माध्यमिक विद्यालय चिकलठाणा शाळेत शाळेचा पहिला दिवस शाळाप्रवेश उत्सव मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान शालेय समितीचे अध्यक्ष श्री मदन काका नवपुते यांनी भूषवले. कार्यक्रमाचे प्रमुख अतिथी स्थान श्री विजय पाटील मुख्य उद्यान अधीक्षक यांनी भूषवले. ढोल ताशांच्या गजरात नवागतांचे स्वागत करण्यात आले.शाळा प्रवेशोत्सव दिंडी काढण्यात आली.शैक्षणिक गुढी उभारण्यात आली. अध्यक्ष व प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते नवीन विद्यार्थ्यांना शालेय ड्रेस व पुस्तके, शालेय साहित्य वाटप करण्यात आले. इयत्ता पहिलीत नवीन प्रवेशित विद्यार्थ्यांचे हातांचे ठसे घेण्यात आले. नवागतांचे प्रवेशासाठी वजन उंची, भाषा विकास, गणन पूर्वतयारी संख्याज्ञान यांसारखे टेबल लावण्यात आले होते. कार्यक्रमाप्रसंगी इयत्ता दहावीच्या गुणवंत विद्यार्थ्यांचा मनीषा उबाळे,प्रतीक्षा रोकडे,सत्कार करण्यात आला. कार्यक्रमास उबाळे ताई ,बरोदे ताई ,अर्जुन रोकडे आधी पालक उपस्थित होते.कार्यक्रमासाठी इयत्ता दुसरी ते दहावीचे विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. शाळेचे मुख्याध्यापक श्री शिंदे सर यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यक्रम यशस्वी पार पडला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्रीमती शिंदे मॅडम यांनी केले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी वाघ सर ,राठोड सर ,राजपूत सर ,सूर्यवंशी सर ,पठाडे सर,पठाण सर, भिंगोले मॅडम, रंधे मॅडम ,माळोदे मॅडम, गणोरीकर मॅडम, बालताई कानडे मॅडम तसेच साबळे मावशीयांनी परिश्रम घेतले .आभार प्रदर्शन भारद्वाज मॅडम यांनी केले.

## ज्ञानसिधु फाउंडेशन च्या वतीने दहावीच्या गुणवंत विद्यार्थी सत्कार कार्यक्रम संपन्न



**पडेगाव (प्रा. शिवाजी गायकवाड) :** मिटमिटा येथिल ज्ञानसिधु फाउंडेशन च्या वतीने आयोजित इयत्ता दहावीच्या गुणवंत विध्यार्थी गौरी गोळवाद, पूजा सूर्यवंशी, पूजा मनगटे, शिवानी कोठाळे, पवन काळे, श्रुती भागडे, अवनी कसलीवाल, रुद्र शिंदे, तन्मय कदम, प्रशांत खडके यांचा सत्कार कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता.जेष्ठ शिक्षक श्री अरुण पवार हे कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होते तर प्रा.डॉ.अंकुश गरुड,मिटमिटा मनपा शाळा व्यवस्थापन परिषद सदस्य प्रा.डॉ.शिवाजी गायकवाड,श्री शिवाजी पवार,कदम सर हे प्रमुख पाहुणे म्हणून होते. फाउंडेशन चे संचालक प्रा.गजानन निवदे आयोजक होते.प्रा.उल्का खैरणार यांनी सूत्रसंचालन केले प्रा.दिपक चव्हाण यांनी आभार प्रदर्शन केले.यावेळी मिटमिटा परिसरातील विध्यार्थी,पालक यांची मोठी उपस्थिती होती.





